
साप्ताहिक

Reg. No. MAHMAR/52088

# धनगर माझा

DHANGAR MAZA

संपादक : धनंजय मारुती तानले मो. ९८२२१७४१९४




❑ VOLUME - 1 ❑ ISSUE NO - 50 ❑ TUESDAY DATE 30 JANUARY TO 5 FEBRUARY 2024 ❑ PUNE ❑ Rs.10 ❑ PAGE 4

## देशात आगामी निवडणुकांचे बिगूल वाजले; १५ राज्यांमधील राज्यसभेच्या निवडणुका जाहीर

**नवी दिल्ली :** महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, तेलंगणा, उत्तराखंड, पश्चिम बंगाल, ओडिशा, आंध्र प्रदेश, बिहार, छत्तीसगड, गुजरात, हरियाणा, हिमाचल प्रदेश, कर्नाटक, मध्य प्रदेश, आणि राजस्थान या १५ राज्यांमधील राज्यसभेच्या ५६ जागांसाठी २७ फेब्रुवारी रोजी निवडणूक होणार असल्याची घोषणा भारतीय निवडणूक आयोगाने केली. या घोषणेमुळे देशात आगामी निवडणुकांचे बिगूल वाजले आहे.




आयोगाने दिलेल्या माहितीनुसार, राज्यसभेच्या निवडणुकांसाठी ८ फेब्रुवारी रोजी अधिसूचना जारी होईल. उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटची तारीख १५ फेब्रुवारी आहे. तर २७ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ४ दरम्यान मतदान होईल. त्याच दिवशी सायंकाळी मतमोजणी होईल.

**राज्यनिहाय राज्यसभेच्या जागा**

महाराष्ट्र - ६, तेलंगणा - ३, उत्तर प्रदेश - १०, कर्नाटक - ४, मध्य प्रदेश - ५, उत्तराखंड - १, पश्चिम बंगाल - ५ ओडिशा - ३ आंध्र प्रदेशातील - ३, बिहार - ६, छत्तीसगड - १, गुजरात - ४, हरियाणा - १, हिमाचल प्रदेश - १, आणि राजस्थानमधील राज्यसभेच्या ३ जागांचा समावेश आहे. वरील १५ राज्यांमधील ५६ खासदारांचा कार्यकाळ एप्रिलमध्ये संपत असल्याने ही निवडणूक घेण्यात येत आहे.

**महाराष्ट्रातील 'या' सहा खासदारांचा कार्यकाळ संपणार**

● कुमार केतकर (काँग्रेस) ● वंदना चव्हाण (राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट) ● प्रकाश जावडेकर (भाजप) ● मुरलीधरन (भाजप) ● नारायण राणे(भाजप) ● अनिल देसाई (शिवसेना उद्धव ठाकरे गट)

**(पान ४ वर)**

## १ फेब्रुवारी रोजी राज्यभर आंदोलन तर ३ फेब्रुवारी रोजी नगर येथे ओबीसींचा राज्यव्यापी एल्गार मेळावा

**मुंबई :** मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी काढलेल्या अध्यादेशाविरुद्ध राज्यातील ओबीसी समाज आणि नेते एकटले आहेत. मराठा आरक्षणाला विरोध करण्यासाठी ओबीसी समाजाकडून राज्यात १ फेब्रुवारीपासून राज्यातील सर्व आमदार, खासदार, तहसीलदार यांच्या घरासमोर आंदोलन केले जाणार आहे. तर ३ फेब्रुवारी रोजी नगर येथे राज्यव्यापी ओबीसी एल्गार मेळावा आयोजित करण्यात येणार आहे असल्याची माहिती मंत्री छगन भुजबळ यांनी दिली. २८ जानेवारी रोजी झालेल्या बैठकीत ठरविण्यात आले आहे. तेव्हा आता १ फेब्रुवारी रोजी राज्यातील ओबीसी समाजाने रस्त्यावर उतरून आंदोलन करावे असेही आवाहन केले




आहे. राज्य सरकारने मनोज जरांगे यांच्या आंदोलांनासमोर नमते घेत त्यांच्या सर्व मागण्या मान्य केल्या आहेत असे असतानाच दुसरीकडे ओबीसींवर अन्याय होत असल्याने ओबीसी नेत्यांकडून याच पार्श्वभूमीवर राज्यातील ओबीसी नेत्यांची बैठक रविवारी २८ जानेवारी मंत्री छगन भुजबळ यांच्या मुंबई येथील शासकीय निवासस्थानी पार पडली. या बैठकीत तीन ठराव संमत करण्यात

**(पान २वर)**

## धनगर आरक्षण अंमलबजावणीसाठी पुन्हा आमरण उपोषण सुरू

**म्हसवड :** धनगर समाजाची दिशाभुल न करता धनगर समाजाच्या हक्काच्या अनुसूचीत जमातीच्या आरक्षणाची अंमलबजावणी करावी यासाठी धनगर समाजातील युवकांनी म्हसवडमध्ये पुन्हा आमरण उपोषण सुरू केले आहे.

दि. २७ पासुन म्हसवड पालिकेसमोर उत्तम विरकर, गणेश केसरकर, प्रकाश हुलवान या ३ युवकांनी आमरण उपोषण सुरु केले आहे. ज्या - ज्यावेळी समाजाने एस.टी.आरक्षणाची मागणी केली त्या त्यावेळी शासनाने समिति नेमून धनगर समाजाची दिशाभूल केल्याचा आरोप आंदोलकांनी केला. वास्तविक आम्ही जे आरक्षण मागत आहोत ते आम्हाला घटनेनेच दिलेले आहे, मात्र त्यात धनगर व धनगड या शब्दाचा घोळ शासनानेच घातलेला आहे. असेही आंदोलकांनी




म्हटले आहे.

या उपोषणाला अनेक संघटनांनी पाठींबा दर्शिवला आहे तर अनेक मान्यवरांनी भेट देत त्यांच्या भूमिकेचे समर्थन केले आहे. दरम्यान म्हसवड येथे सुरु असलेल्या सदर उपोषणास माण - खटावच्या उपविभागीय अधिकारी उज्वला गाडेकर, माणचे तहसिलदार विकास अहिर आदींनी भेट देत उपोषणकर्त्यांची चर्चा करीत त्यांचे म्हणणे ऐकुन घेत याबाबत वरिष्ठांना कळवण्याचे आश्वासन दिले.



# संपादकीय...

## ...तरच देश सुजलाम् सफलाम् होईल

भारत हा कृषीप्रधान देश आहे. आज भारताने औद्योगिक क्षेत्रात खूप प्रगती केली असली, तरी कृषी हाच भारताचा मुख्य व्यवसाय आहे. भारतीय शेतकरी आपल्या भूमीला आपली ‘काळी माता’ समजतो आणि तिची सेवा करतो. स्वातंत्र्योत्तर काळात शेतीसाठी खूप सोयी सवलती दिल्या गेल्या. धरणे बांधली गेली. कालवे काढले गेले. त्यामुळे शेतीचा विकास झाला. ‘हरित क्रांती’ झाली. आज आपण अन्नधान्याच्या बाबतीत स्वावलंबी झालो आहोत. आपल्याला धान्यासाठी ‘भिक्षां देहि’ करावी लागत नाही. पण तरीही आज शेतीपुढील शेतकऱ्यापुढील आव्हाने संपली आहेत का ? नाहीत. नित्य नवी आव्हाने शेतकऱ्यापुढे उभी असतात आणि छोटा शेतकरी तर त्यांत होरपळलेला असतो.

आपल्याकडे शेती ही वंशपरंपरेने पुढे जात असते. त्यामुळे उपलब्ध शेताच्या सतत वाटण्या होत असतात. शेतांचे तुकडे पडतात. त्यामुळे एखाद्या व्यक्तीच्या वाट्याला लहानसा तुकडा येतो. तो त्याच्या कुटुंबालाही पुरेसा नसतो. मग स्वाभाविकच तो उपजीविकेसाठी दुसरा उद्योग शोधतो. नाहीतर दुसऱ्याच्या शेतात शेतमजूर म्हणून राबतो. आपल्या देशात शेतमजुराचे जीवन अतिशय दुःखद आहे. त्याला त्याच्या कष्टाच्या तुलनेत अतिशय कमी मजुरी मिळते. शेतीची कामे संपली की त्याच्या वाट्याला येते बेकारी. लहान शेतीमुळे आपल्याकडे शेतीतील प्रयोगही करता येत नाहीत. सतत कसल्यामुळे ती जमीन नापीक बनते. शेतीतील हे दोष जाणूनच विनोबा भावे यांनी ‘ग्राम-भूमी’ कल्पना मांडली होती. साऱ्या गावाची भूमी एकत्र करायची आणि ‘सब भूमी गोपालकी’ म्हणून सर्वांनी त्या शेतात राबायचे. येणारे पीक वाटून घ्यायचे. या प्रयोगामुळे कसण्याची भूमी विशाल झाली की नवेनवे प्रयोग करता येतील. उत्पादनक्षमता वाढवता येईल.

बदलत्या युगात जगात शेतीवर खूप प्रयोग केले जात आहेत. आपल्याकडेही त्याच्यासाठी कृषिसंस्था, कृषिविद्यापीठे आहेत. तेथे पिके, खते, माती, औषधे, रोगराई याबाबत सतत संशोधन चालू असते. हायब्रीड पिके, जपानी भातशेती, इस्रायली प्रकारची शेती अशा नव्यानव्या कल्पना येतात. शेतीचे काम हलके व्हावे म्हणून नवी नवी अवजारे शोधली जातात. पण या गोष्टी अनेकदा छोट्या शेतकऱ्यांपर्यंत पोचतच नाहीत. ते जुन्याच पद्धतीने शेती करत राहतात. शेतकऱ्यांसाठी दिलेल्या सवलतीही त्यांच्यापर्यंत पोहोचत नाही. मग कर्जाच्या विळख्यात ते अडकतात व शेवटी आत्महत्येचा मार्ग स्वीकारतात. अनेकदा शेतकरी एखादे पीक असे घेतो की, त्या वर्षी तेच पीक अनेक शेतकरी घेतात- टोमॅटो, कांदे, ऊस. मग त्यांच्या पिकाला भाव येत नाही. पुष्कळदा कसणाऱ्या शेतकऱ्यापेक्षा मधला दलाल जास्त पैसे मिळवतो. शेतकऱ्याच्या कच्च्या मालावर प्रक्रिया करणारे कारखाने, शेतमालाची साठवणूक करणारी यंत्रणा इत्यादी शेतकऱ्याला सहज उपलब्ध हव्यात. त्यांच्या सोयीसुविधा जवळच हव्यात. टोमॅटोचे पीक भरपूर आल्यावर त्याच्यापासून सॉस, केचप करणारा कारखाना त्या शेतकऱ्याला उपलब्ध असावा. एकंदरीत, शेतीचा व्यवस्थापनाच्या दृष्टिकोनातून विचार व्हायला हवा. तसा तो होत नाही. उत्पादनखर्चाच्या तुलनेत शेतमालाला भाव मिळाला पाहिजे. विक्रीतून वरकड रक्कम जेव्हा शेतकऱ्याच्या हातात पडेल, तेव्हा तो शेतीसंबंधी अधिक विचार करील. शेतीची उत्पादनक्षमता वाढवली पाहिजे. त्यासाठी प्रथम पायाभूत सुविधांचे जाळे उभारावे लागेल. खतपाणी व कच्चा माल योग्य प्रमाणात व योग्य भावात मिळाला पाहिजे. तसेच शेतीवर सतत संशोधन होत राहिले पाहिजे. शेतमालाच्या वितरणाचीही योग्य अशी व्यवस्था निर्माण केली पाहिजे. अवर्षण, अतिवर्षण, पिकावर पडणारी कीड, आग इत्यादी अनेक आपत्तींत करावयाच्या उपायांची आधीपासून योजना आखली पाहिजे. थोडक्यात शेती हा व्यवसाय मानून त्याचे योग्य रीतीने व्यवस्थापन केले, तर शेतीपुढील बरीच आव्हाने संपतील आणि आपला देश खऱ्या अर्थाने ‘सुजलाम् सुफलाम्’ होईल.


हे वृत्तपत्र मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक श्री. धनंजय मारुती तानले यांनी श्री साई ग्राफिक्स, डीएसके चिंतामणी, सी-विंग, दुकान क्रमांक ३८, अप्पा बळवंत चौक, शनिवार पेठ, पुणे. येथे मुद्रित करून कार्यालय धनगर माझा श्रीनाथ क्लासिक बिल्डिंग, दुसरा मजला, सर्वे नंबर ६९०/३/४, भोसरी, पुणे - ४११ ०३९ येथे प्रकाशित केले. **मोबा.:** ७२७६५४०४०४
**काही वाद-विवाद असतील तर ते पुणे न्यायालयीन कक्षेत सोडविले जातील.**

# समाजबदलाचे शक्तिशाली साधन ‘अहिंसा’!

*** महात्मा गांधी यांच्या बद्दल या ७ गोष्टी माहित आहेत का ?**

३० जानेवारी, महात्मा गांधी यांची पुण्यतिथी. सत्य आणि अहिंसा यांचे प्रेरणास्रोत अशी गांधीजींची ओळख असून २ ऑक्टोबर हा बापूंचा जन्मदिवस ‘जागतिक अहिंसा दिन’ म्हणून साजरा केला जातो. तर ३० जानेवारी बापूंचा स्मृतिदिन ‘हुतात्मा दिन’ म्हणून पाळला जातो. जगभरातल्या तत्वज्ञनात त्यांचा गांधीवादही समाविष्ट झाला आहे. पुढील स्लाइड्सवर क्लिक करून पाहा महात्मा गांधी यांच्या बद्दल माहीत नसलेल्या ७ गोष्टी. १) शांततेच्या नोबेल पुरस्कारासाठी गांधीजींचे नाव पाच वेळा नोबेल समिती समोर आले होते. मात्र त्यांना हा सर्वोच्च पुरस्कार मिळाला नाही. गांधीजींच्या मृत्यूनंतर त्यांना नोबेल पुरस्कार न मिळाल्याची खंत पुरस्कार समितीने व्यक्त केली होती. २) भारताच्या स्वातंत्र्यासाठी ब्रिटिशांविरुद्ध गांधीजी आयुष्यभर लढले. ब्रिटिशांनी गांधीजींच्या मृत्यूनंतर २१ वर्षांनी त्यांच्या सन्मानार्थ टपाल तिकीट काढले. ३) महात्मा गांधी यांची अंतयात्रा ही ८ किलोमीटर लांब होती. जवळजवळ १० दशलक्ष लोकं अंतयात्रेत सहभागी झाले होते. ४) गांधीजींनी आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक प्रसिद्ध व्यक्तींना पत्रे लिहीली आहेत. यात हिटलर, टॉल्सटॉय आणि आइन्स्टाइन यांचा समावेश आहे. ५) भारत स्वतंत्र झाल्यानंतर पहिल्या संविधान सभेत पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या भाषणादरम्यान गांधीजी उपस्थित नव्हते.

६) हात्मा गांधीयांच्या मृत्यूवेळी त्यांनी परीधान केलेले कपडे आजही संग्रालयात सुरक्षीत ठेवण्यात आले आहेत.



७) ॲपल कंपनीचे संस्थापक स्टीव जॉब यांच्यावर महात्मा गांधीजींच्या विचारांचा पगडा होता. गांधीजींना सन्मान देण्यासाठी म्हणून गोल फ्रेमचा चश्मा वापरत.

*** तत्त्वे** :- गांधीजीनी एकादश (अकरा) व्रतांचा स्वीकार केला होता. ती पुढीलप्रमाणे. अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रम्हचर्य, अपरिग्रह, शरीरश्रम, आस्वाद, सर्वत्र भयवर्जन (निर्भयता), सर्वधर्म सामान्ताव्य (सर्वधर्म समभाव), स्वदेशी, स्पर्शभावना (अस्पृश्यतेचा त्याग). निर्भयता या तत्वाला गांधीजी आधारभूत मानत. त्यांच्यामते निर्भयतेमुळेच इतर तत्वांचे पालन करता येऊ शकते.

*** सत्य** :- गांधीजींनी आपले आयुष्य सत्याच्या शोधासाठी अर्पण केले होते. त्यांचे आत्मचरित्र माझे सत्याचे प्रयोग या नावाखाली प्रसिद्ध आहे. गांधीजींनी म्हटले आहे की, सर्वांत महत्त्वाची लढाई ही स्वतःच्या वाईट प्रवृत्ती, भय आणि असुरक्षितता यांच्यावर मात करणे ही होय. परमेश्वर सत्य आहे. असे त्यांचे मत होते. पुढे त्यांनी ते, सत्य (हेच) परमेश्वर आहे. असे बदलले.

*** अहिंसा** :- जरी अहिंसेचे तत्त्व गांधीजींनी स्वतः मांडले नसले तरी इतक्या मोठ्या राजकीय स्तरावर अहिंसेचा अवलंब करणारे ते पहिले व्यक्ती होते. हिंदू, बौद्ध, जैन, ज्यू धर्मात अनेक ठिकाणी अहिंसेच्या तत्त्वाचा उल्लेख आहे. माझे सत्याचे प्रयोग मध्ये गांधीजींनी त्यांचे अहिंसेचे तत्त्वज्ञान मांडले आहे. ते म्हणतात, जेव्हा मी निराश होतो,तेव्हा मी स्मरण करतो की, इतिहासात प्रत्येक वेळी सत्य आणि प्रेमाचाच विजय होत आला आहे.

*** लेखन** :- महात्मा गांधींनी विपुल लेखन केले आहे. अनेक दशके त्यांनी बऱ्याच वर्तमानपत्रांचे संपादन केले. यामध्ये गुजराती, हिंदी आणि इंग्रजीमधील हरिजन, दक्षिण आफ्रिकेमध्ये असतांना इंडियन ओपिनियन आणि भारतात परत आल्यावर इंग्रजीमधील यंग इंडिया, गुजराती मासिक नवजीवन यांचा समावेश आहे. नंतर नवजीवन हिंदीमधून पण प्रकाशित केले गेले. या बरोबरच, ते जवळपास प्रत्येक दिवशी अनेक वर्तमानपत्रांना आणि व्यक्तींना पत्रे लिहीत असत. गांधींनी काही पुस्तके सुद्धा लिहिली आहेत. त्यांचे आत्मचरित्र माझे सत्याचे प्रयोग या नावाखाली प्रकाशित झाले आहे. त्यांच्या दक्षिण आफ्रिकेतील संघर्षावर त्यांनी **"Satyagraha in South Africa (दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रह)"** हे पुस्तक लिहिले आहे. तसेच त्यांनी **‘हिंद स्वराज’** किंवा **"Indian Home"** ही राजकीय पुस्तिका लिहिली आहे आणि जॉन रस्किनच्या **"Unto This Last"** चे गुजराती भाषांतर केले आहे. हा शेवटचा लेख त्यांच्या अर्थशास्त्रावरील विचारसरणीचे वर्णन करतो.

# १ फेब्रुवारी रोजी राज्यभर आंदोलन तर ३ फेब्रुवारी रोजी...

**(पान १ वरून)**

आले. १ फेब्रुवारीपासून राज्यात ओबीसींनी आंदोलन करावं असेही आवाहन मंत्री छगन भुजबळ यांनी केलं आहे. त्याचबरोबर मराठवाड्यातून सुरुवात करत संपूर्ण राज्यात ओबीसींची एल्गार यात्रा काढली जाणार आहे अशी माहिती मंत्री छगन भुजबळ यांनी दिली.

**ओबीसी आरक्षणात वाटेकरी घुसवण्याचे उद्योग थांबवा : भुजबळ**

मराठ्यांना आरक्षण द्यायला आमचा विरोध नाही. त्यांना ओबीसीच्या कोट्याबाहेर आरक्षण द्या. पण त्यांना कुणबी प्रमाणपत्र देऊन ओबीसी आरक्षणात वाटेकरी घुसविण्याचे उद्योग थांबवा एवढीच आमची भूमिका आहे, असे मंत्री छगन भुजबळ म्हणाले. ओबीसी आरक्षणाची लढाई सरकारमध्ये राहून लढणार की बाहेर पडून लढणार, असा प्रश्न छगन विचारण्यात आला. यावर भुजबळ म्हणाले, ते माझ्या पक्षाने ठरवावे. मुख्यमंत्र्यांनी ठरवावे. मला त्याची काही चिंता नाही. ओबीसी प्रश्नाचे दुःख आणि संताप आहे. मी एकटा नाही. माझ्या मागे ओबीसी समाज आहे. लाखो लोक आहेत. ओबीसी बांधवांचे, भटक्यांचे कित्येक वर्षांनी मिळणारे आरक्षण समाप्त होत आहे, याची आग मनात भडकत आहे, असे भुजबळ म्हणाले.



# चलो बीड : ११ फेब्रुवारी रोजी धनगर आरक्षण अंमलबजावणी इशारा मेळाव्याचे आयोजन




**बीड :** धनगर समाजाला अनुसूचित जमाती आरक्षण तात्काळ लागू करण्याच्या मागणीसाठी ११ फेब्रुवारी रोजी बीड येथे धनगर आरक्षण अंमलबजावणी इशारा मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. अशी माहिती यशवंत सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष बालासाहेब दोडतले व प्रदेशाध्यक्ष माणिकराव दांगडे पाटील यांनी अंबाजोगाईत रविवारी पत्रकार परिषदेतून दिली आहे.

मागील अनेक वर्षांपासून धनगर समाज बांधव लढा देत आहेत. याप्रश्नी विविध माध्यमांतून यशवंत सेनेच्या वतीने सातत्यपूर्ण प्रयत्न सुरूच आहेत, याच प्रयत्नांचा एक भाग म्हणून यशवंत सेनेच्या वतीने अंबाजोगाई येथील शासकीय विश्रामगृह येथे पत्रकार परिषदेत बोलताना यशवंत सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष बालासाहेब दोडतले व प्रदेशाध्यक्ष माणिकराव दांगडे पाटील यांनी सांगितले की, धनगर समाजाला अनुसूचित जमातीचे आरक्षण लागू करण्याच्या मागणीसाठी धनगर समाजाने सातत्याने विविध प्रकारची अनेक आंदोलने करून ही महाराष्ट्र राज्य सरकार धनगर समाजाच्या आरक्षण मागणी संदर्भात उदासीन आहे.

सरकारने १५ फेब्रुवारी पर्यंत धनगर समाजाला एस.टी. प्रवर्गाचे आरक्षण लागू करावे हा अंतिम इशारा देण्यासाठी बी.के. कोकरे प्रणित यशवंत सेनेच्या वतीने ११ फेब्रुवारी रोजी बीड येथे धनगर आरक्षण अमलबजावणी इशारा मेळाव्याचे आयोजन केले आहे. तसेच धनगर समाजाच्या घटनात्मक मागणीकडे दुर्लक्ष करणाऱ्या सरकारला जागे करण्यासाठी दिनांक २२ फेब्रुवारी पासून यशवंत सेनेच्या वतीने मुंबईत आझाद मैदानावर उपोषण सुरू करणार आहोत. आझाद मैदानावर उपोषणाला जाण्यापूर्वी श्रीक्षेत्र चौंडी येथून धनगर आरक्षण दिंडी काढण्यात येणार आहे. तसा निर्धार आम्ही केला आहे. अशी माहिती यशवंत सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष बालासाहेब दोडतले व प्रदेशाध्यक्ष माणिकराव दांगडे पाटील यांनी पत्रकारांशी बोलताना दिली. तरी या मेळाव्यासाठी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन संयोजन समितीच्या वतीने केले आहे.

धनगर समाजाच्या हक्काचं व्यासपीठ
नियमित वाचा साप्ताहिक
धनगर माझा

# प्रयागबाई-बळीराम कुंभारगावे दाम्पत्याचा राज्यस्तरीय आदर्श माता-पिता पुरस्काराने सन्मान



**कंधार :** डोक्यावर पटका, धोतर, हातात काठी अन दुसऱ्या हातात नववारीतील आपल्या सहचारिणीचा हात धरून आलेली जोडपी, नाव जाहीर होताच नातवांनी केलेला एकच जल्लोष. आई- वडलांच्या कौतुकाने दाटलेला कंठ अन डोळ्यात दाटलेले अश्रू आणि सुरकुतलेल्या चेहऱ्यावर पसरलेले समाधान असे हृद्य चित्र होते सुसंगत फौंडेशन राज्यस्तरीय आदर्श माता-पिता सन्मान पुरस्कार वितरण समारंभाचे.

पुण्यातील एस. एम. जोशी सभागृहामध्ये शनिवारी (दि. २७) रोजी हा पुरस्कार वितरण सोहळा पार पडला. यामध्ये स्वा. रा. ती. मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. पंडित विद्यासागर, महाराष्ट्र इकोनॉमिक्स कौन्सिलचे सल्लागार सचिन इटकर यांच्या हस्ते नांदेड जिल्ह्यातील लालवाडी (ता. कंधार) येथील प्रयागबाई - बळीराम कुंभारगावे या दाम्पत्यासह राज्यभरातून आलेल्या तीसहुन आलेल्या ज्येष्ठांचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी उद्योजक सोपान वेळे, डॉ. आशुतोष रारावीकर फौंडेशनचे संस्थापक सुधाकर न्हाळदे, सचिव संगीता न्हाळदे, विजयकुमार ठुबे, माजी सनदी अधिकारी आनंदराव कुंभारगावे, प्रा. मुरहरी कुंभारगावे आदि उपस्थित होते.

'पाशिचमात्त्य देशात आज समाजव्यवस्था पूर्ण उद्‌ध्वस्त झालेली दिसते. अनेक तरुण व्यसनाधीनतेकडे वळलेले आढळतात. पाल्य आणि पालक यांच्यामध्ये असणारा ओलावा आटत गेल्याने ही परिस्थिती निर्माण झाली आहे, तसे आपल्याकडे होऊ नये यासाठी परस्परातील प्रेमाचे बंध अधिक दृढ करणे गरजेचे आहे. त्यासाठी माता-पिता सन्मानसारखे आनंदसोहळे मोलाचे ठरतात,' असे मत डॉ. विद्यासागर यांनी व्यक्त केले.

'इथे आलेल्या बहुतांश ज्येष्ठांनी काबाडकष्ट करून आपल्या पाल्यांना शिक्षण देऊन त्याना स्वतःच्या पायावर उभे राहण्याचे बळ दिले, त्यातूनच खऱ्या अर्थाने 'भारता'ची वाट 'इंडिया' च्या दिशेने सुरू झाली. आजच्या 'इंडिया'तील 'इक्वलिटी ऑफ अपोर्च्युनीटी' ही 'भारता'च्या या सुरकुतलेल्या हातानी केलेल्या कष्टावर पोसली आहे, अशा शब्दात सचिन इटकर यांनी आपली भावना व्यक्त केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुधाकर न्हाळदे यांनी केले. सूत्रसंचालन माणिक सोनवलकर आणि जागृती कुलकर्णी यांनी केले.

# दोन मंदिरे, दोन गाव; मूर्ती मात्र एकच : श्री खंडोबा यात्रा मैलारपूर नळदुर्ग

धाराशिव जिल्ह्यातील तुळजापूर तालुक्यामधील अणदूर व मैलारपूर नळदुर्ग येथील श्री खंडोबाची मोठ्या उत्साहात संपन्न झाली.

एक देव, दोन गाव, दोन मंदिरे अशी श्री खंडोबा देवाची लेखी देवाण घेवाण होते. शेकडो वर्षांपासून ही परंपरा आजही चालू आहे. नळराजाची पत्नी दमयंतीच्या भक्तीसाठी नळदुर्ग येथे अवतरलेल्या व श्री बानाई देवी विवाह सोहळ्यामुळे ही यात्रा परिसरात प्रसिद्ध आहे.





तुळजापूर तालुक्यातील अणदूर व मैलारपुर नळदुर्ग ही दोन गावे आहेत . या दोन गावांमध्ये वेगवेगळी दोन मंदिरे आहेत. मात्र, या दोन्ही गावातील मंदिरात मूर्ती मात्र एकच आहे. अणदूर येथील मंदिरात श्री खंडेरायाची मूर्ती सव्वा दहा महिने वास्तव्यास असते. तर मैलारपूर नळदुर्ग येथील मंदिरात श्री खंडेरायाची मूर्ती पावणे दोन महिने वास्तव्यास असते. या दोन्ही मंदिराचे मुख उत्तरेकडे असून दोन्ही मंदिरातील मंदिराची रचना जवळपास सारखीच आहे. मंदिराच्या बांधकामावरती लिहिलेल्या शिलालेखावरून असे दिसून येते की, मंदिर हे इसवी सन सोळाशे ते सतराशे या शतका मधील असावेत.

**लेखी करार करून देवाची देवाण घेवाण** - अणदूर येथील देशमुख, कुलकर्णी, पाटील, मानकरी व नळदुर्ग येथील देशमुख, कुलकर्णी, पाटील व मानकरी यांच्या साक्षीने कागदावरती देवाच्या देवाण-घेवाणीचा लेखी करार केला जातो. या करारात असे नमूद केले जाते की, सालाबाद प्रमाणे व रितीरिवाजा प्रमाणे श्री खंडोबा देवास चंपाषष्टीच्या उत्सवाकरीता मैलारपूर नळदुर्ग येथे घेऊन जात आहोत. चंपाषष्टीचा उत्सव व पौष पौर्णिमा यात्रेकरीता देवास घेऊन जात आहोत. पौष पौर्णिमा यात्रा संपल्यानंतर पौष नवमीच्या पूजेला अणदूर मुक्कामी पाठवत आहोत, असा करार या दोन्ही गावच्या मानकरांच्या मध्ये स्वाक्षरीने केला जातो. या कराराचे वाचन दोन्ही गावचे मानकरी श्री खंडेरायाच्या समोर करतात. बेल भंडाऱ्याची उधळण करून हा करार श्री खंडेरायाच्या साक्षीने नळदुर्गचे मानकरी अणदूरच्या मानकऱ्यांना देतात. व देव नळदुर्गकरांना दिला जातो. ही परंपरा अनेक शतकापासून चालू असून आजही परंपरा या दोन्ही गावातील मानकरी श्री खंडेरायाच्या साक्षीने पाळतात.

शब्दांकन : सुनील ढेपे
(ज्येष्ठ पत्रकार)

**पौष पौर्णिमा यात्रा**

पोष पोर्णिमा यात्रा भरण्यामागची अख्यायिका अशी सांगितली जाते की, श्री खंडोबा व म्हाळसादेवी यांच्या लग्नानंतर त्यांची वरात (छबिना स्वरूपात) काढण्याचा सोहळा म्हणजे पौष पौर्णिमेची यात्रा साजरी करणे होय. मात्र, ही यात्रा परंपरा शेकडो वर्षांपासून चालत आलेली आहे. या दिवशी मैलारपूर येथे मोठी यात्रा भरते. अणदूर मंदिरातून श्रींचे वाहन असलेले दोन अश्व वाजत गाजत मैलारपूर येथे मानाच्या काठ्यांसह येतात. येथील जुन्या व नवीन मंदिरास प्रदक्षिणा घालून देवाचा छबिना संपन्न होतो. यात्रेच्या नोंदणीनंतर श्री खंडोबा देव पुन्हा सव्वा दहा महिन्यांसाठी अणदूर मुक्कामी जातात, अशी ही शेकडो वर्षाची परंपरा आजही चालू आहे.

# रोडच्या कडेला टाकलेले अन्न खाल्ल्यामुळे जवळपास २०० मेंढ्यांचा मृत्यू, २५ लाखापेक्षा जास्त नुकसान

**पुणे :** मावळ तालुक्यातील लोणावळा जवळ मुंबई पुणे हायवेच्या शेजारी टाकलेले अन्न मेंढ्यांनी खाल्ल्याने विषबाधा होऊन मेंढपाळ काळूराम शिवाजी बरकडे (रा. वानकुटा, ता. पारनेर, जि. नगर) यांच्या तब्बल २०० मेंढ्यांचा मृत्यू २ दिवसात झाल्याने मेंढपाळ कुटुंबावर दुखा:चा डोंगर कोसळला आहे.

दि २८ जानेवारी रोजी दुपारी ४ नंतर मेंढपाळ काळूराम शिवाजी बरकडे आपल्या जवळपास २०० पेक्षा जास्त मेंढ्यांचा कळप मावळ तालुक्यातील लोणावळा जवळ जेवरेवाडी शिवारात आपल्या मेंढया चारत असताना मेंढया रोडच्या कडेला पडलेल्या अन्नाच्या ढिगार्याणकडे गेल्या आणि पटपट चारा समजून ते सडलेले अन्न खाऊ लागल्या. परिणामी ३ ते ४ तासानंतर करंडोली



येथे रात्रीच्यावेळीच वाड्यावर टप्प्या - टप्प्याने जवळपास ११७ मेंढ्यांचा मृत्यू झाल्याने मेंढपाळांच्या वाड्यावर रात्रभर आक्रोश पाहावयास मिळाला. तर २९ जाने दुपार नंतर जवळपास ८० मेंढया मरण पावल्या आहेत. अचानक एकाएकी मेंढ्यांचा मृत्यू होऊ लागल्याने मेंढपाळालाही काही समजेनासे झाले. सकाळी मेंढपाळाच्या वाढयावरील आक्रोश पाहून संपूर्ण गाव धावून आले होते. याठिकाणी आलेला प्रत्येकजण समोरील दृश्य पाहून हळहळ व्यक्त करीत होता.

सदर घटनेचा शासनाच्या वतीने पंचनामा केला. यावेळी नायब तहसिलदार केदारी, तलाठी जाधव, मंडळ अधिकारी उज्वला पवार सह गावचे सरपंच, पदाधिकारी यांनी येऊन भेट दिली व मेंढपाळ कुटुंबाचे सांत्वन केले व शासनाकडून मदत मिळवून देण्याचे आश्वासन दिले आहे. त्यानंतर जेसीबीच्या सहाय्याने सर्वच्या सर्व मेंढया पुरण्यात आल्या.

## आ. महेश लांडगे यांच्या हस्ते पुण्यश्लोक अहिल्यादेवी अभ्यासिका व वाचनालयाचे उद्‌घाटन

**भोसरी :** विदर्भातून पुणे, पिंपरी चिचवड शहरामध्ये शिक्षणासाठी आलेल्या मुलासाठी सोय व्हावी या सामाजिक उद्देशाने २६ जानेवारीच्या मुहूर्तावर भोसरी येथे बांधण्यात आलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी अभ्यासिका व वाचनालयाचे उद्घाटन नुकतेच आ. महेश लांडगे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी राष्ट्रवादी कोंग्रेसचे शहराध्यक्ष अजित भाऊ गव्हाने, मा. नगरसेवक सागर गवळी, विंनायताई तापकिर, विकास डोळस, कुलदीप परांडे, रामहारी अघडते गुरुजी, रामदासजी होपळ, नीलकंठ बचे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.



सदर वाचनालय उदरनिर्वाहाच्या, व्यवसायाच्या निमित्ताने पुणे, पिंपरी शहरात येऊन स्थायिक झालेल्या समाज बांधवांनी एकत्र येऊन स्थापन केलेल्या राजमाता अहिल्यादेवी वैदर्भीय धनगर समाज ट्रस्टच्या वतीने उभारण्यात आले आहे. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष नागेश वसतकार, सचिव नंदू गुरव, ओंकारराव घटाळे, गजानन वसतकार, ज्ञानेश्वर बाजोडे, वसंतराव अघडते, गजानन सोनोने, संजय होपळ, विजय दिवनाले, सज्वल पुंडे, कैलास इलामेगार, शरद बोरसे, वसंतराव वसतकार, ज्ञानेश्वर बोरसे, ज्ञानेश्वर वरप, गणेश पुंडे, रामेश्वर पुंडे, योगेश कळंब, दिलीप सोनोने यांनी प्रयत्न केले.

## भागोजी चॅरिटेबल ट्रस्टचे समाजशील वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न

**मुंबई :** प्रत्येक कार्यात प्रत्येकालाच सिंहाचा वाटा उचलता येणे शक्य नसतं; परंतू आपापल्यापरीने त्यात सामील होत खारूताईचा वाटा होणे शक्य असते. या उक्तीला अनुसरून गेली अनेक वर्षे भागोजी चॅरिटेबल ट्रस्ट रजि. मुंबई वतीने प्रति वर्षी समाजशील उपक्रमाचे आयोजन करण्यात येते. प्रतिवर्षी प्रमाणे ह्याही वर्षी रविवार दि.२८ जानेवारी २०२४ रोजी यशवंतराव चव्हाण सेंटर, नरिमन पॉईंट, चर्चगेट - मुबंई येथे वार्षिक स्नेहसंमेलन आणि पुरस्कार वितरण सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

यावेळी ज्येष्ठ समाज नेते राजू जांगळे, जयसिंगतात्या शेंडगे, बृहन्मुबई महानगरपालिका मा. उपयुक्त लक्ष्मण व्हटकर, सामाजिक कार्यकर्ते अशोकजी जंगले, अशोक डफले यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी निवेदक राम जांगळी यांनी सामजिक कार्यकर्ते अशोक जंगले यांची अनुभवलेले भयानक, रोमांचक समाजाला दिशा देणारी मुलाखत घेतली तर विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना विशेष पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

यावेळी श्री. धोंडू उर्फ अण्णासाहेब गोरे, उदय दणदणे, दिनेश सावंत, ॲड-भक्ती कोकरे, कु. अनिकेत धनावडे, कु. शेखर झोरे यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार देवून सन्मानित करण्यात आले. तसेच माहेरवाशींनीचा हळदीकुंकू सोहळा या प्रसंगी संपन्न झाला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निवेदक राम जांगळी यांनी केले तर संस्थेचे सचिव अनंत देसाई यांनी उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

## देशात आगामी निवडणुकांचे बिगूल वाजले; १५ राज्यांमधील राज्यसभेच्या निवडणुका जाहीर

**(पान १ वरून)**

१३ राज्यांतील ५० राज्यसभा सदस्यांचा कार्यकाळ २ एप्रिल रोजी तर २ राज्यांतील उर्वरित ६ सदस्यांचा कार्यकाळ ३ एप्रिल रोजी संपत आहे.

२०२४ मध्ये राज्यसभेचे ६८ खासदारांचा कार्यकाळ संपत आहे. मात्र, पहिल्या टप्प्यात एप्रिलमध्ये कार्यकाळ संपणाऱ्या खासदारांची संख्या जास्त म्हणजे ५६ आहे. त्यात महाराष्ट्र, गुजरात आणि मध्यप्रदेशातून प्रत्येकी २ तर राजस्थान, ओडिशा आणि कर्नाटक मधून प्रत्येकी १ असे ९ केंद्रीय मंत्र्यांचा देखील कार्यकाळ संपत आहे.

केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान, पर्यावरण मंत्री भूपेंद्र यादव, आरोग्य मंत्री मनसुख मंडाविया, माहिती तंत्रज्ञान मंत्री राजीव चंद्रशेखर, केंद्रीय मत्स्य व पशुपालन मंत्री पुरुषोत्तम रूपाला, राज्यमंत्री एल मुरुगन, परराष्ट्र राज्यमंत्री व्ही मुरलीधरन, सूक्ष्म लघु आणि मध्यम विभागाचे मंत्री नारायण राणे या ८ मंत्र्यांचा राज्यसभा खासदारकीचा कार्यकाळ २ एप्रिलला तर रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्या खासदारकीची मुदत ३ एप्रिल संपणार आहे.

तसेच माजी पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग, भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे पी नड्डा, काँग्रेस नेते सय्यद नासीर हुसेन, समाजवादी पक्षाच्या जया बच्चन, भाजपा मुख्य प्रवक्ते अनिल बलूनी, राष्ट्रीय जनता दलाचे मनोजकुमार झा, बिहारचे वरिष्ठ नेते सुशीलकुमार मोदी (भाजप), काँग्रेसचे डॉ. अभिषेक मनु सिंघवी या प्रमुख नेत्यांचा राज्यसभेचा कार्यकाळ देखील संपत आहे.




This newspaper Owner, Printer, Publisher and Editor Shri. Dhananjay Maruti Tanle at Shri Sai Graphics, DSK Chintamani, C-Wing, Shop No. 38, Appa Balwant Chowk, Shaniwar Peth, Pune. Printed Herein. Published at Office - DHANGAR MAZA, Shrinath classic Building, 2nd floor, Survey No. 690/3/4, Bhosari Pune - 411 039.
**Mobile : 7276540404 If there are any disputes, they will be resolved in Pune Courts.**